Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-XI Nov. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

नागदेवाचार्य यांच्या व्यक्तिमत्वातील विविध पैलू : विशेष संदर्भ स्मृतिस्थळ

डॉ.बालाजी विठ्ठलराव डिगोळे
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

नागदेवाचार्य हे भटोबास या नावाने महानुभाव पंथात प्रसिध्द होते. स्मृतिस्थळ या ग्रंथात नागदेवाचार्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू व्यक्त झाले आहेत महानुभाव पंथाचे थोर आचार्य, कुशलपंथ संघटक, युत्पन्न पंडित, आदर्श गुरू, सुबोध मार्गदर्शक, आदर्श शिष्य, महानुभाव पंथातील सर्वांचा जिवलग मित्र, एक चांगला माणूस, मराठी भाषेचा अभिमानी असे अनेक पैलू भटोबासांच्या व्यक्तिमत्वात होते.

स्मृतिस्थळातील पहिल्याच स्मृतित चक्रधर यांच्या निर्वाणानंतर महानुभाव पंथात किती प्रकारचे लोक आले. चक्रधरांचा परिवार केवढा मोठा होता याचे वर्णन करून भटोबासांच्या चरित्राची थोडक्यात रूपरेषा दिली आहे. लहानपणी एक खोडकर मुलगा म्हणून त्यांची प्रसिध्दी होती. त्यांच्या वडिलांचे नाव सारंगपाणी आणि आईचे नाव आबाईसा होते.

‘‘भटोबासांचे पीते माधवभट :
तेयांचे पीते वडील :
सारंगपाणी भट :
ते वाटे मारवले :
आणि उमाइसाचे हात हात रितै जाले :
तेने दुखें आबाइसीं रावंसगावी गुंफा केली
परमेश्वर रामदेवासी भेटी जाली :
तेथौनी परमेश्वराचेया संबंधा योगी
होआवेया कारण जाले :’’

वडील लहानपणीच वारलेले आणि मुलगा अतिशय खोडकर म्हणून त्याच्या आईने गावाच्या बाहेर एका झोपडीत मोठया कष्टाने जीवन कंठले. दादोस (महानुभाव पंथाचा रामदेव उर्फ दादोस हा अधिकारी होता.) याच्यामुळेच सर्व परिवार चक्रधरांच्याकडे आकर्षिला गेला. भटोबास त्याची बहीण उमाइसा, आई आबाइसा, चुलतबहीण महदाइसा असे सर्वजण सिन्नर येथे (नगरजवळ गाव) चक्रधरांना भेटले.

‘‘होत तेथ भटोबास मानीती नव्हे तेथ म्हणेति :
हे श्री मुखीचे शब्द नव्हे ति : हे होति :
उपाध्येचीय अनुभवीची तिया
उपाध्यांते पुसावीया :
नाथोचिया अनुभवीचीया त्या नाथेपुसावीया :
जयाचीये अनुभवीचीया त्या त्यातेंचि पुसावीया :

त्या भेटीत भटोबासांनी सुरूवातीस विशेष कांही वाटले नाही; परंतु सहा-सात वेळा भेटल्यावर मात्र ते चक्रधरांच्या व्यक्तिमत्वाने प्रभावी झाले आणि वयाच्या 32 व्या वर्षी ते चक्रधरास अनुसरले (शिष्यत्व स्वीकारणे) 4 वर्षे चक्रधरांचा प्रेमळ सहवास भटोबासांना मिळाला. मधल्या काळात सहा महिने ते गोविंदप्रभूंच्या सहवासात गेले.

''म्हाइंभट दास्यी होड घाली म्हणणे
ही स्मृती मी मूळाबरहुकूम ठेवली आहे
हे स्मृति श्रीप्रभु गोसावी असता ऋध्दिपूरी
जाणावी चरित्री मांडिता नये:
म्हणोनि नींबा घातली :''

परंतु आपल्या पंथाचे नेतृत्व भटोबास आपल्या नंतर चांगल्या प्रकारे करू शकतील असा विश्वास चक्रधरांकडून भटोबासाने संपादन केला. चक्रधराच्या निवार्णानंतर चक्रधरांचा बहुतेक शिष्य परिवार ऋध्दिपूर येथे गोविंदप्रभूच्या सहवासात आला. तेथे भटोबासांनी चौदा वर्षाचा काळ घालविला. गोविंदप्रभूच्या निधनानंतर मात्र भटोबासांनी आपला मुक्काम हलवला आणि नींब (निंबागणेश ता.पाथरी जि.परभणी) या गोदावरी काठी आपल्या शिष्य परिवारासमवेत वास्तव्य केले. महानुभाव पंथाचे चांगल्या प्रकारे रक्षण केले. खरे म्हणजे चक्रधांच्या निर्वाणानंतर महानुभावपंथ नामशेष झाला असता. कारण लवकरच महाराष्ट्रावर मुसलमानांचे आक्रमण झाले. धर्म धोक्यात आला. त्या परिस्थितीत महानुभावपंथास भक्कम बळकटी व सुरक्षा देण्याचे कार्य भटोबासांनी केले. भटोबासांची जडण घडण अशी होती. त्यात महानुभाव तत्वज्ञान व आचारधर्म पूर्णपणे रूजले होते. आयुष्याच्या अखेरपर्यंत भटोबास तत्वनिष्ठ राहिले.

1) पंथाचे आचार्य :-

महानुभाव पंथाचे पहिले आचार्य म्हणून भटोबासांना ओळखले जाते कारण भटोबास, भास्करभट्ट बोरीकर, दामोदर पंडित, हिराइसा, केशिराजबास, नरेंदपंडित यासारख्या महान ग्रंथकाराना मोठया कुशलतेने पंथात आणले. आपल्या पंथाचे नेतृत्व करताना त्यांनी कुणाचेही मन जिंकले नाही. ज्यांना या पंथात येण्याची तीव्र इच्छा झाली त्यांनाच त्यांनी आपल्या पंथात प्रवेश दिला. टीकाकारांची टीका प्रसंगावधान राखून मोठया कुशलतेने टीकाकरांचे तोंड गप्प केले. खरे म्हणजे हे काम करण्याची भटोबासांना फारशी गरजच पडत नसे. कारण म्हाइंभट, भास्करभट्ट बोरीकर, केशिराजबासासारखे लोक आपल्या प्रभावी आचरणाने व विचाराने टीकारांची तोंडे गप्प करीत असत. महानुभावपंथात एकापेक्षा एक श्रेष्ठ कवी, चरित्रकार निर्माण झाले. याचे महत्वाचे कारण म्हणजे भटोबासांची प्रेरणा होय. 'लीळाचरित्रा'सारखा अनुपमेय ग्रंथ महानुभाव पंथात केवळ नागदेवाचार्यांच्या प्रेरणेनेच निर्माण झाला. किंवा नरेंद्रबासासारखा श्रेष्ठ राजकवी नागदेवाचार्यांच्या व्यक्तिमत्त्वाने असा काही भारावून गेला की, त्याने राजाश्रेयावर लाथ मारली आणि तो महानुभाव पंथात आपल्या ग्रंथासह (रूक्मिणीस्वयंवर) आला. या सर्व घटना जशाच्या तशा 'स्मृतिस्थळा'त आल्या आहेत. म्हणून नागदेवाचार्य दीक्षा देणारे आचार्य नव्हते. तर मराठीत श्रेष्ठ दर्जाचे ग्रंथ लिहिणाऱ्या ग्रंथकाराचे व कवींचे फार मोठे प्रेरणास्थान होते.

2) मराठी भाषेविषयीचा अभिमान :-

भटोबासांना मराठी भाषेबद्दल अतिशय प्रेम व अभिमान होता एकदा केशिराजबासांनी 'रत्नमालास्त्रोत' (लीळाचरित्रातील संस्कृत पद्यानुवाद) लिहिले.

''नागनाथाचे सीख्य मालोबास:
तेही स्मृति : वृध्दाचार :
केसोबासाचीया रत्नमाळामाजि
नामावली स्त्रोत केले.
स्मृति संस्कृता करित होते:
सारी श्लोक केले :
एक म्हणति सावशे :''

आणि ते भटोबासांना दाखविले ते पाहून भटोबासांना आनंद झाला; पण तो आनंद तेवढयापुरताच होता कारण त्यानंतर संस्कृतमधूनच 'उध्दरण' नावाच्या ग्रंथाची रचना करण्याचा विचार केशिराजबासांनी बोलून दाखविताच भटोबास म्हणाले -

''केशवदेयासि संस्कृती सरळि :
आणि पंडितासि संस्कृति मऱ्हाठिया सरळी :
नको गा केशवदेया:
ऐणे माझिया म्हातारिया नागवतील :''

संस्कृतरचना भोळया भाविकांना कळणार नाही. त्यांची नागवणूक होईल. असे भटोबासांनी सुचविले. त्यानंतर मात्र केशिराजबासांनी संस्कृत वचनांचा नाद सोडून मराठीत 'दृष्टांतपाठ', 'सूत्रपाठ' या रचना केल्या. किंवा एकदा केशवबासाने भटोबासांना संस्कृतभाषेत प्रश्न केला त्यावर भटोबास म्हणाले -

''पंडिता: केशवदेया :
तुमचा अस्मात कस्मात्
मी नेणे गा :
मज श्रीचक्रधरे नीरोपीली मऱ्हाटी:
तियाचि पुसा:''

अशा प्रकारचा मराठी विषयी भटोबासाना ज्याज्वल्य अभिमान होता; पण याचा अर्थ भटोबासांना संस्कृत येत नव्हते. असे मात्र नाही. कारण अनेक संस्कृत विद्वानाशी भटोबासांनी धर्म चर्चा केल्याचे प्रसंग स्मृतिस्थळात आहेत. एकदा भटोबास प्रवासात एके ठिकाणी सकाळीच जेवले. ते एका ब्राम्हणाने पाहिले आहे. हे दाखवून दिले. त्यावर भटोबासांनी एक संस्कृत श्लोक तात्काळ त्याच्या तोंडावर फेकला आणि प्रवासात धर्माच्या आचरणात थोडीसी शिथीलता आणल्यास फारशी हरकत नसते. हे दाखवून दिले. यावरून संस्कृत भाषेची उपस्थिती भटोबासांच्या जवळ होतीच; पण याशिवाय मराठी भाषेचाही अभिमान होता.

3) सुस्पष्ट मार्गदर्शन :-

महानुभाव पंथातील अनुयायी भोंगळ व अंधश्रध्दाळू असूनही आणि त्यांच्या श्रध्देस डोळसपणा प्राप्त व्हावा. यादृष्टीने भटोबासांनी वेळोवेळी किती स्पष्ट व परखड मार्गदर्शन केले हे स्मृतिस्थळातील अनेक स्मृतितून दिसून येते. एकदा भटोबसांनी पिण्यासाठी पाणी सांगीतले. एका अनुयायाने त्यांना अस्वच्छ डबक्यातले पाणी आणून दिले. भटोबासांनी ते पाणी घेतले; पण ते म्हणाले, मला असे घाणेरडे पाणी पाजेल हे ठीक आहे; पण इतरांना मात्र असे पाजवू नका त्यावर तो अनुयायी म्हणाला –

''भटो! बोडी (डबके) गंगा समान सांगितले की:''
त्यावर भटोबास म्हणाले -
''ते आपणयासि: पुढीलासि (दुसऱ्याला)
संपादिता ते बोडिचि गंगा ते गंगाचि:
ऐसी बुध्दी होआवी की:''

महात्म्यांनी महानुभाव पंथातील दीक्षा घेतलेल्या लोकांना चातुर्मासात कसे राहावे (आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन) याचे मार्गदर्शन करताना एकदा भटोबास म्हणाले, महात्म्यांनी आठ महिने सतत हिंडत रहावे. चातुर्मासात मात्र एका प्रदेशात; परंतु दोन-चार गावी राहावे. महात्म्यांनी वेळी अवेळी गावाजवळ फार काळ राहू नये. 'गाऊनि गावा जाइजे' असे भटोबासांचे सांगणे होते. आपले श्रेष्ठत्व किंवा गुणदोष एखाद्या गावात प्रकाशात येणार नाहीत. तोपर्यंतच तेथे असावे प्रापंचिक वस्तूंचा संग्रह करू नये. सुईचा देखील महात्म्यांनी संग्रह करू नये. अशी भटोबासांची आज्ञा होती. जे लोक राजस आणि तामस प्रवृत्तीचे आहेत. त्यांनी अटन आणि 'विजन' (प्रवास-एकांत) हा मार्ग पत्करावा. म्हणजे संसाराबद्दल आसक्ती वाटणार नाही. अशा प्रकारचा वैराग्याचा बोध प्रसंगानुसार भटोबास करीत असत. एकदा गौराइसेने एकाकडून तूप विकत घेतले. अर्थात ज्याच्याकडून तूप घेतले त्याच्या भांडयात दोन पळया तूप उरले. ते गौराइसेने मागितले. हे ती म्हणाली - ''हे आम्हा महात्मेयासि दया'' असे म्हटल्यावर त्याने ते तूप देऊन टाकले. हे जेंव्हा भटोबासांच्या लक्षात आले. तेंव्हा हे जादा तूप त्यांनी परत केले आणि गौराईसेची चांगलीच कान उघाडणी केले आणि म्हणाले -

''हे तूप : नको घेवो :
हे महात्मेपण विकणे म्हणा''

अशा तऱ्हेने आपल्या वैराग्याचे भांडवल केलेले भटोबासांना आवडत नसे. एकदा भटोबास देमाइसेकडे जेवण्यासाठी गेले तेंव्हा चुकून तूपाऐवजी करडीचे तेल भटोबासांना वाढले गेले; पण त्याबद्दल भटोबासांनी यत्किंचितही तक्रार केली नाही. वास्तविक त्या तेलाचा देमाईसेला घाण वास येत होता. त्याबद्दल तिला दुःखही होते; पण भटोबासांना मात्र त्याबद्दल कांहीही वाटत नव्हते. त्यांना तूप आणि करडीचे तेल यात फरक वाटत नव्हता ते म्हणाले -

''करडेल यैसा (असा) कांही मी
स्वाद जाणे तरि रूपैची आण:''

यावरून वैराग्याचा एक आदर्श भटोबासांनी घालून दिला ज्यांचे ठिकाण परमेश्वर स्वरूपाबद्दल ज्ञान आहे. पण परमेश्वरास अनुसरण्याची तळमळ नाही तर ते ज्ञान व्यर्थ आहे असे तळमळीचे उद्‌गार भटोबासांनी कामाइसेचे मृत्यूनंतर काढले कामाइसा ही राजाराम देवराव यांची राणी ती नागदवोचार्यंना अनुसरण्यासाठी मरेपर्यंत तळमळत राहिली यावरून भटोबासांनी वरील बोध केला. महानुभाव पंथातील साधकांनी हा ब्राम्हण, हा शुद्र असा भेदभाव ठेऊ नये अशी भटोबासांची शिकवण होती. म्हणूनच भटोबासांनी शरण आलेल्यांची कधी ही जात विचारली नाही आपल्या पंथातील अनुयायांनी धर्मचर्चा करावी पण त्याचबरोबर परमेश्वराचे नामस्मरण ही करावे असे भटोबासांनी केशिराजबासास परखडपणे सुनावले होते. आपल्या पंथातील साधकांनी प्रवासात एकमेकास सोबत करावी आणि पंथाचे आचरण करावे किंवा आचार धर्मातील ज्या गोष्टी विषयी शंका असतील त्याबद्दल वडिलधाऱ्या मंडळींना विचारावे याशिवाय वैयक्तिक जीवनात साधकांनी कोणतेही अनिष्ठ वर्तन करू नये आणि म्हणाले-

''हांगा: असतीपरि ते काइ
माझेया बापासि वीहीली?

माझा केशव शुकयोगींद्र की गाः
हा जेहीं पाउलीं उठिला आहे ते मी
याचे काइसेया मोडीन?''
'वासनिका बुझावणी करणे'
पंडिता केसोदेयांसि चर्चा करिता उजळले
पंडिताचे गीत ते माझे हाकारे गा
तुम्ही माझे डोळे की गाः
पंडिता केसवद्याः
केशवदेनि मार्गाते राखीले गा
हेचि माझे महात्मे खाते तरी देवाते
आठवावेया दक्ष होते''

उदा :- साधकांनी वासनिकांच्या पात्रात जेऊ नये, किंवा प्रसाद म्हणून उष्टे खाऊ नये, किंवा पान-सुपारी, कांदा इत्यादी गोष्टी साधकास वर्ज्य आहे. अशा प्रकारचे कठोर नियम भटोबासांनी घालून दिले आहे. परमेश्वर चिंतनावाचून एकक्षणही व्यर्थ जाऊ नये असे भटोबासांचे सांगणे होते. थोडक्यात स्मृतिस्थळातील अनेक स्मृतितून भटोबासांनी महानुभाव पंथाच्या आचार धर्माबद्दल जी शिकवण होती त्यातून अनायासेच महानुभाव पंथाच्या आचार धर्माबद्दल कल्पना येते.

4) भावनाप्रधान नागदेवाचार्य :-

महानुभाव पंथाच्या आचार धर्माबद्दल काटेकोर व कठोर असणारे भटोबास खाष्ट नव्हते. तर ते एक भावनाप्रधान भक्त होते. म्हणूनच चक्रधरांच्या निर्वाणानंतर दुःखाने व शोकाने भटोबास अक्षरशः वेडे झाले, रानोमाळ, हिंडू लागले 'चक्रधर', 'चक्रधर' असा आक्रोश करू लागले. कुठेही बेशुध्द अवस्थेत ते पडून राहत असत. त्यांच्या तोंडात फळांचे रस पिळत असत. शेवटी महदाईसेस (रूपैची - टोपण नाव) त्यांचा शोध लागला. आणि तिने त्यास एखाद्या लहान बाळाप्रमाणे पाठकुळी घेऊन सुरक्षित आणले. यावरून भटोबास किती भावनाप्रधान होते हे दिसून येते. चक्रधर ज्या ज्या ठिकाणी गेले. त्या त्या स्थनांना भेट देताच भटोबासांना चक्रधरांची आठवण होऊन अस्वस्थ वाटत असत. पैठणला तर त्यंना मुक्काम करणे देखील अवघड गेले. कारण पैठणला चक्रधरांचा बराच काळ गेला होता. चक्रधरांवर भटोबासांचे इतके प्रेम होते की, त्यांच्या स्पर्शाने पवित्र झालेली वस्त्रे, दागिने किंवा इतर वस्तू भटोबासांना वंद्य वाटून त्यांनी त्या जतन करून ठेवल्या होत्या. बेलापूरला तर जाण्याची कल्पनाच भटोबासांना सहन होत नव्हती. कारण तेथूनच चक्रधरांनी उत्तरापंथे गमन केले होते. त्यामुळे बेलापूरला जाणे भटोबासांना अवघड वाटत असत. आपल्या गुरबद्दलही जशी प्रेमाची भावना भटोबासांच्या मनात होती त्याचप्रमाणे आपल्या अनुयायांच्या बद्दल देखील अतिशय प्रेमाची भावना भटोबासांच्या मनात होती. उदा :- अनंतदेव हा एक लहान वयाचा मुलगा भटोबासांना अनुसरला. त्यावरून त्याच्या आईने भटोबासाकडे येऊन खूप त्रागा केला. त्यास म्हणाली, मग मात्र भटोबासांनी अनंतदेवास त्याच्या आईबरोबर परत पाठविले. त्यानंतर मात्र अनंत देव आजारी पडला आणि लवकरच मेला. हे जेंव्हा भटोबासांना कळले तेंव्हा त्यांना अतिशय वाईट वाटले. माझ्या निमित्ताने हा मेला वास्तविक याबद्दल मी सुध्दा माझ्या पोटात सुरी खुपसली पाहिजे. असे भटोबास म्हणाले. किंवा हिराइसेच्या मुलीचा मृत्यू झालेला असताना देखील तिने भटोबास आणि अन्य लोकांना

त्याक्षणी पोटभर जेऊ घातले. आपल्या संप्रदायात केवढे धैर्यशील लोक आहेत. याबद्दल त्यांना कौतुकही वाटले. एकदा तर कविश्वरबास यांच्या गीता-व्याख्यानाचा आनंद लुटताना भटोबास म्हणाले -

''तू म्हणतासि आणि माझे अंत:करण
अवघे चंद्रमये होतायेः''

अशा रितीची भावनाप्रधानता भटोबासांच्या ठिकाणी होती. त्याचबरोबर भटोबासांच्या ठिकाणी कांही वेळा अदृश्य वस्तू दृश्य करणे. किंवा पुढील होणाऱ्या घटनांचे कथन करणे. अशा कांही सिध्दी होत्या. उदा : राणीकामाइसेची हरवलेली बिरूदी (दागिना) कुठे पडली आहे. हे भटोबासांनी सांगितले. किंवा लवकरच महाराष्ट्रावर परक्यांचे आक्रमण होणार आहे व त्यात रामदेवराय यादव पकडला जाईल. असे भविष्य भटोबासांनी नोंदविले. किंवा स्वत:च्या मुक्तीबद्दल भटोबासांनी अगोदरच सर्वांना जाणीव करून दिली. अर्थात या सिध्दींचे प्रदर्शन किंवा भांडवल करणे ही गोष्ट भटोबासांना संमत नव्हती. त्यांचे अंगी इतकी नि:स्पृहता होती की, प्रत्यक्ष राणी कामाइसा भेटीकरीता आलेली असताना तिला सहजासहजी पंथात येण्याची परवानगी दिली नाही. तसेच एकदा एका वासनिकाने त्यांची सुवर्णपुष्पांनी व रेशमी वस्त्रांनी पुजा केली. हे पाहून भटोबसांच्या डोळयातून अश्रू वाहू लागले कारण आपल्यासारख्या विरक्तासही अडचण आहे. असे त्यांना वाटू लागले. थोडक्यात एक आदर्श महात्मा व मार्गदर्शक आणि प्रेमळ माणूस या दृष्टीने भटोबासांच्या अंगी अनेकविध गुण होते. हे वरील उदाहरणांवरून स्पष्ट होते.

भटोबासांची नि:स्पृहता व त्यागी वृत्ती दर्शविणारी एक बोलकी आठवण स्मृतिस्थळात आली आहे. दुष्काळ पडला त्यामुळे महानुभाव पंथातील भिक्षुकांना भिक्षा मिळणे बंद झाले; परंतु ही गाष्ट कित्येक दिवस भटोबासांना माहित झाली नाही. मग एके दिवशी सहजच भिखुकांच्यख़ झोळीत त्यांनी हात घातला. तर काय त्यात फक्त तळाशी चिंध्या होत्या. भटोबासांना खुप वाईट वाटले. त्यांनी त्यादिवशी रात्री सर्वांनाच बोलावले आणि सर्वांसमोर दंडवत घालून आपली एक मागणी सर्वांनी मान्य करावी अशी विनंती केली. हा प्रकार पाहून सर्वचजण गजबजून गेले आणि भटोबासांची विनंती मान्य केल्याचे सांगितले. भटोबास म्हणाले -

''मज म्हातारदाम आला असे
तो विनियोगावा : आजि लागौनि
एकि भिक्षा घेयावि :''

अशी विनंती करताच सर्वांनी ती मान्य केली. अशा तऱ्हेने आपल्या निस्पृह वृत्तीने भटोबासांनी आपल्या पंथियांना आपल्या पेन्शनमधून (म्हातारदाम) दिले.

एक तर एक ग्रस्थ मी स्वत: चक्रधरच आहे असे भासवून आश्रमात राहू लागला. अनेक भोळे लोक त्यांना चक्रधरच समजू लागले; परंतु म्हाइंभटाना मात्र खुपच अस्वस्थ वाटू लागले. तोतया चक्रधरांस कसे हाकलून द्यावे. असा प्रश्न निर्माण झाला. नेमके त्यावेळी भटोबास कुठे तरी गेले होते. म्हाइंभटाने तेथे जाऊन तोतया चक्रधरांची कैफियत सांगितली आणि एक नाजूक प्रश्न त्या तोतयास विचारावा. त्याने जर योग्य उत्तर दिले तर ते खरे चक्रधर आहेत असे मानावे. अशा प्रकारचा उपाय भटोबासांनी सुचविला. त्या उपायांचा अवलंब करताच तोतया चक्रधर घाबरून गेला आणि तो पळून गेला अशा बिकट परिस्थितीतही महानुभाव पंथाचे व चक्रधरांच्या परिवाराचे संरक्षण भटोबासांनी केले. मरते समयी भटोबासांचे अंत:करण किती विशाल होते हे समजते. शेवटपर्यंत आपल्या कानावर चक्रधरांचा उपदेश पडावा अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली आणि सर्वांना हात जोडून ते म्हणाले –

''गोसावियांचा व्यापार चालविता
कोण्हा माझे वेकाश गेले असैल:
तरि तुम्ही समस्ती क्षेमा करावी''

असे म्हणून भटोबासांनी देह त्याग केला. यावरून भटोबासांचे अंत:करण किती निर्मळ होते आणि चक्रधरनिष्ठा त्यांच्या रोमा-रोमात कशी भिनली होती हे त्यांच्या वरील उउद्गारावरून दिसून येते. भाद्रपद वद्य द्वादशी शके 1224 मध्ये भटोबासांचे निर्वाण झाले. ही नोंद 'स्मृतिस्थळा'त आढळते.

संदर्भग्रंथ :-

1) वा.ना.देशपांडे, 'स्मृतिस्थळ', व्हीनस प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती, 1997
2) प्र.न. जोशी, 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', प्रसाद प्रकाशन पुणे, सुधारलेली दुसरी आवृत्ती, 1978
3) ल.रा. नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती, 1997
4) मोहन शेळके, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
5) श्रीधर कुलकर्णी, 'मध्ययुगीन मराठी साहित्य : एक पुनर्विचार', राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1995
6) कृ.प.देशपांडे, 'सातीग्रंथ : स्वरूप आणि समीक्षा', सन पब्लिकेशन, पुणे.